जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर. ६५९४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१. यांचे कार्यालय.
दिनांक :- 19 JUN 1996

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक व्हीएलएस-१०९५/(२२८) प्राशि-३ दिनांक १८-१-९६ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यांत येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९५ पासून इयत्ता १ली ते सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस प्राथमिक शाळा सुरु करण्यांत खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाणी | इयत्ता | माध्यम. |
|---|---|---|---|---|
| १) | श्री शिवाजी एज्युकेशन सोसा. बावडा. ता. इंदापूर | श्री शिवाजी प्राथमिक विद्यालय बावडा | इ. १ ली - १ (एक) तुकडी फक्त<br>इ. २ री —॥— | मराठी |

२. १. सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२. २ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२. ३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायीक अर्हता आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या आधिन राहून नेमला पाहिजे.

२. ४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतीक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यांसाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२. ५. संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वियन केले पाहीजे. व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

२. ६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित केल्या पाहिजेत.

..२..

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकुल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशिरपणा नियमीतपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथ. शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यांत येईल.

२.१२. शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षांत करणे] करणे बंधनकारक राहिल. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यांत येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करुन घेऊन मगच संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत इत्यादि प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा.]

७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत - प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, -------- जिल्हा -------- यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत - मा. सचिव,
श्री शिवाजी एज्युकेशन सोसा. बावडा ता. इंदापूर जि. पुणे
यांना माहितीसाठी अग्रेषित.

8

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [प्राथ]
जा.क्रं. जिप/शिक्षण/प्राथ/२/४/तुकड्या/९७
पुणे-१ दिनांक:- ११ .४.१९९७

प्रति,
मुख्याध्यापक,
शिवाजी विद्या प्रा. शाळा बावडा ता. इंदापूर

विषय:- मान्यताप्राप्त अनुदानित / विना अनुदानित / अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना जादा / नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या / वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत.

संदर्भ:- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्रं. प्रा/प्राशि/खाप्राशा/जा.क्रं./पोआर दि. निरंक
२/ —— " —— ३८६५ दि. ५/३/९७

संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या शाळेस सन - १९९६-९७ या वर्षासाठी जून-९६ पासून खाली दर्शविलेल्या इयत्तांना नैसर्गिक वाढीने जादा तुकडीस कायम स्वरुपी ~~अनुदान तत्वावर~~ / विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्रं. | शाळेचे नांव | इयत्ता | जादा तुकडी नैसर्गिक तुकडी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | शिवाजी विद्या. प्राथ. शाळा बावडा ता. इंदापूर | ३री ची १ली तुकडी | | |

शिक्षणाधिकारी [प्राथ]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

Seen
[signature]
25/4/97
२५/४/९७.

जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/जा. तु. /पीआर/ 3320.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 16 MAR 1999

प्रति,

१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे विभाग.

२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

३] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

विषय :- मान्यताप्राप्त ~~अनुदानित/~~विनाअनुदानित/~~कायम विनाअनुदानित~~ खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत....

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/~~जादा तुकडीस~~ जून, १९९८ पासून ~~अनुदान/~~विनाअनुदान/~~कायम विनाअनुदान~~ तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव. | माध्यम. | इयत्ता. | तुकडी/जादा/नै. वाढ. | शेरा/मंजूर/नामंजूर. |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. शिवाजी प्राथमिक विद्यालय, बावडा, ता. इंदापूर. | मराठी | इ. ४थी ची १ली तु. मान्य. | नैसर्गिक. | मंजूर. |

स्थळ प्रतीवर मा. शि. उ. से यांची सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता.

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
श्री. शिवाजी प्राथमिक विद्यालय,
बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे.

8
७३।५५

67

११२८/१३००

**कायम विनाअनुदान तत्वावर**

जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/तृ. मा./पुवि
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 19 MAY 2004

प्रति

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे

विषय : खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/प्राथमिक शाळांना सन २००१-०२ व ०२-०३ यावर्षी इ. १ ली ते ७ वी चे नवीन अतिरिक्त वर्ग/तुकड्या मंजूर करण्याबाबत.

संदर्भ : शासन परिपत्रक क्र.व्हीएलएस-१००४(६६/०४)/प्राशि-३, दि. २३.२.२००४

सदर २००१-०२ या शैक्षणिक वर्षात उपरोक्त विषयाबाबतचे प्राप्त झालेल्या प्रस्तावास उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळांना नैसर्गिक/अतिरिक्त वाढीच्या वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर मंजूरी मिळालेली आहे, त्यानुसार सदर शाळेस खालील अटींच्या अधिन राहून वर्गांना मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | | मंजूरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | | ६. |
| १. | श्री. शिवाजी प्राथमिक विद्यालय, बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे | मराठी | जिप | १ ली | दुसरी | जून २००२ |
| | | | | २ री | दुसरी | जून २००३ |

१. नैसर्गिक / अतिरिक्त वर्गाचे वाटप करतांना शासन निर्णय दिनांक २.१२.१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यात यावी.

२. मंजूर करावयच्या नैसर्गिक/अतिरिक्त वर्गाची गरज आहे. याची ख्यातरजमा करुन त्यानंतर वर्ग / तुकड्या मंजूर करण्यात याव्यात.

तसेच ज्या अतिरिक्त / नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेली आहे. त्या शाळांकडून कायम विनाअनुदान तत्वावर तुकडी चालविण्यास तयार आहे असे हमीपत्र घेतल्यानंतरच संबंधित तुकडीस मंजूरी द्यावी.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१. मुख्याध्यापक,
श्री. शिवाजी प्राथमिक विद्यालय, बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे.

२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

D:\depru\awrk\P_MVT.doc

**कायम विनाअनुदानित तत्वावर**

जाक्रप्रा./प्राशि/खाप्राशा-तुमा/पुवि/०६
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 28 SEP 2006

प्रति

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

**विषय** : खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/प्राथमिक शाळांना सन २००१-०२, २००२-०३, २००३-०४, २००४-०५ व २००५-०६ या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकड्या मंजूर करणेबाबत.

**संदर्भ** : १. मा. शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र. प्राशातु-११०६(१५८/२००६),प्राशि-३, दि. ५ जून २००६
२. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडील क्र. खाप्राशा/तुमा/६०७३३/१२७५१/ड-५१२, दि. १५.६.२००६

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव पडताळून संचालनालयास सादर करण्यात आले होते. त्यानुसार संदर्भाधीन पत्रान्वये आपल्या कार्यक्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळांतील वर्ग/अतिरिक्त तुकड्यांना खालील प्रमाणे **कायम विनाअनुदानित तत्वावर** मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | तुकडी | मंजूरी वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | आदर्श विद्यामंदीर शाळा क्र. ३ भेकराई नगर, फुरसूंगी, ता. हवेली | मराठी | जिप | ४ थी | तिसरी | जून २००४ |
| २. | शिवाजी प्राथमिक विद्यालय, बावडा, ता.इदापूर | मराठी | जिप | ३ री | दुसरी | जून २००४ |
| | | | | ४ थी | दुसरी | जून २००५ |
| ३. | प्राथमिक विद्यामंदिर, पणदरे, बारामती | मराठी | जिप | ४ थी | दुसरी | जून २००४ |
| ४. | प्रेरणा प्राथमिक विद्यामंदिर, आळंदी देवाची | मराठी | जिप | ७ वी | दुसरी | जून २००३ |

१. नैसर्गिक वाढीचे वर्ग / अतिरिक्त तुकड्या शासन निर्णय दि. २.१२.१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्यात यावी.

२. मंजूर करावयाच्या नैसर्गिक वाढीचे वर्ग / तुकड्यांची गरज आहे, याची खातरजमा करुन त्यानंतरच वर्ग/तुकड्या मंजूर करण्यात याव्यात.

३. सदरचे प्रथम वर्ग / अतिरिक्त तुकड्यांना कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी दिलेली असल्यामुळे सदर शाळांकडून कायम विनाअनुदान तत्वावर वर्ग / तुकडी चालविण्यास तयार आहे व भविष्यात शासनाकडे अनुदानाची मागणी केली जाणार नाही असे हमीपत्र घेण्यात यावे. .

सदर शाळांना वर्ग मंजूरी आदेश आपण आपले स्तरावरुन तात्काळ निर्गमित करण्यात यावेत

स्थळप्रतीवर मा. शि. उ. स. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहितीस्तव सादर
१. संबंधित शाळा.
२. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

E:\TK_Ord0506.doc